



हीरकमहोत्सवी
कोल्हापूर चित्पावन संघाचे
मुखपत्र

स्थापना : १९६४

# मासिक नवस्नेह

६१

वर्ष १२ वे : अंक ३
जून २०२६





प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

**४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५**

**Visit us on www.kolhapurchitpavan.com**
**ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com**
**https: //www.facebook.com/kolhapurchitpavan**

# पुरुषोत्तम मास दाम्पत्य भोजन सोहळा



शनिवार, दि. २३ मे २०२६ रोजी कोल्हापूर चित्पावन संघातर्फे पुरुषोत्तम मासानिमित्त दाम्पत्य भोजन सोहळा खरे मंगल कार्यालय येथे उत्साहात पार पडला. यावेळी १७ यजमानांनी या सोहळ्यात भाग घेऊन पुण्य प्राप्त केले. २०० हून अधिक भाविकांनी या कार्यक्रमात प्रसादाचा लाभ घेतला. विष्णु पूजा सौ. व श्री. क्षितीज गोरे यांनी केली तर पौरोहित्य श्री. सुशांत वडेर यांनी केले.

# श्री. इंद्रनील बंकापुरे यांचा कार्यक्रम 'मंदिराच्या देशा'




## ❊ सस्नेह निमंत्रण ❊

कोल्हापूर चित्पावन संघाचा

**'वर्धापन दिन समारंभ'**

गुरुवार, दि. ४ जून, २०२६ रोजी

मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येणार आहे.

याप्रसंगी संघाच्या कार्यालयात सकाळी

**श्री सत्यनारायण महापूजा**

संपन्न होणार असून दुपारी ४ ते ७ वाजेपर्यंत

सर्व सभासद व हितचिंतकांनी

कोल्हापूर चित्पावन संघाच्या कार्यालयात येऊन

तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा, ही विनंती.

आपले नम्र,

केदार जोशी — कार्यवाह

मकरंद करंदीकर — अध्यक्ष

आणि सर्व संचालक मंडळ सदस्य

भगवान श्री परशुराम जयंतीनिमित्त श्री. इंद्रनील बंकापुरे यांचा 'मंदीराच्या देशा' हा कार्यक्रम दि. १९ एप्रिल २०२६ रोजी होणार होता परंतु पावसामुळे रद्द झाला. तोच कार्यक्रम रविवार, दि. १७ मे २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वा. मंगलधाम येथे घेण्यात आला. प्रास्ताविक ब्राह्मण सभा करवीर मंगलधामचे अध्यक्ष श्री. दीपक आंबर्डेकर यांनी केले. कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे कार्यवाह श्री. धर्मराज पंडीत यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. श्री. इंद्रनील बंकापुरे यांनी भारतातील मंदिरांची वैशिष्ट्ये, त्यांचा इतिहास आणि मंदिरे कशी बघावी याविषयी प्रोजेक्टरद्वारे खूप सुंदर माहिती दिली. कार्यक्रमाला ३०० हून अधिक प्रेक्षक उपस्थित होते. बंकापुरे यांनी दिलेली माहितीने सर्वांना खिळवून ठेवले. कोल्हापूर चित्पवान संघाचे उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे यांनी आभार मानलेनंतर चहापानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## दु:खद निधन

कोल्हापूर चित्पावन संघाचे हितचिंतक
श्री. अविनाश वैशंपायन यांचे
नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले.
कोल्हापूर चित्पावन संघ आणि नवस्नेह परिवार
यांच्यातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

वर्ष १२ वे : अंक ३ : जून २०२६

• **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे

• **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ.मंजुश्री गोखले 8805355200

• **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984

### अनुक्रम

१) **संपादकीय /४**

२) **मालती दास्ताने /५**
– वैदेही जोशी

३) **रुद्र वीणेचा उलटा भैरव /८**

४) **ज्ञानसूर्याची सावली /१०**
– सौ. मंजुश्री गोखले

५) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी' /१३**
– सौ. मंजुश्री गोखले

६) **अधिक मास /१६**
– कमला हर्डीकर

७) **मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा /१९**
– ओंकार गाडगीळ

८) **भारतरत्न गोविंद वल्लभ पंत/२०**
– विकास मेहेंदळे

९) **जपमाळ १०८ मण्यांचीच का असते /२३**

१०) **अवीट गोडीचे गीतरामायण /२४**
– श्री. सुधीर दाजी जोशी

११) **वधूवर माहिती यादी /२५**

• **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६

• **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०



हीरकमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५

• **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष) 9421113005
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष) 9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह) 7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह) 8459019091
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार) 8149480034

• **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231-2541823
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

• **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305


• **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611

**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**

या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. ४ वर दिली आहे.**

# संपादकीय... 

नमस्कार मंडळी !

गुड न्यूज ऐकली का? मान्सून वेळेवर येणार म्हणे! ऐकलं आणि उगीचंच अंगावर शिरशिरी आली! मला वाटतं हा जूनचा अंक तुमच्या हातात पडेपर्यंत बहुतेक मान्सूनही आला असेल. मनात एक विचार आला. तो सूर्य उष्णता बाहेर फेकतोय, आपल्याला एवढं उकडतंय ! मग ही उष्णता त्यालाही जाचत असेल ना ! त्याला किती उकडत असेल? बरं! आपण निदान रात्री तरी त्याच्या या जाचापासून वाचतो, पण त्याला ना दिवस, ना रात्र, नुसतं तळपत रहायचं ! शिवाय थोडासा दिलासा द्यायला नवस्नेहही नाही त्याच्याजवळ ! गरीब बिचारा सूर्य ! असो. पण आता त्याचा हा जाच संपणार हे नक्की. शिवाय दिलासा द्यायला नवस्नेह तर आहेच ! मित्रांनो, दिवाळी अंकासाठी काही तयारी केलीत की नाही? नसेल तर लगेच करा. दिवाळी अंकातही 'जे जे उत्तम, उदात्त, उन्नत !' असंच साहित्य असणार याची खात्री देतो आम्ही !

आता याच अंकात बघा ना, 'जपाच्या माळेत १०८ च मणी का असतात' ही माहिती सांगणारा लेख अंकात आहे. आपल्यापैकी बऱ्याच जणांना हे माहीत नाही. शिवाय आपली नेहमीची सदरे आहेतच. दिवाळी अंकातही असेच विशेष लेख आपण घेणार आहोत. अर्थात त्यात तुमचीही साथ लागेलच ! तुमचं आणि आमचं नातंच तसं आहे.

मित्रांनो, असं म्हणतात की,

**खास रिश्तोंका कभी**<br>
**अंत नही होता ।**

**कितनी भी दूरियाँ हो**<br>
**एहसास खत्म नही होता ।**

असंच तर आहे आपलं नातं ! आणि ते तसंच कायम राहू दे ! मग चला तर, मान्सूनच्या स्वागतासाठी तयार राहूया ! इतक्या तप्त वातावरणानंतर तोच तर सुखाचा शिडकावा देणारा आहे. अर्थात 'नवस्नेह' ही आहेच म्हणा ! असो.

सगळं सगळं महाग झालंय. निदान स्नेह तरी स्वस्त असू दे ! ही तुम्हा सर्वांना विनंती. आणखी काय लिहू? थांबते ! धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,<br>
**सौ. मंजुश्री गोखले,**<br>
मो. ८८०५३५५२००

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**<br>
**युनियन बँक ऑफ इंडिया,**<br>
**महाद्वार रोड शाखा**<br>
खात्याचे नाव<br>
**कोल्हापूर चित्पावन संघ**<br>
**(खाते क्र. 641002050000001)**<br>
**IFSC Code : UBIN0564109**<br>
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**<br>
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**<br>
खात्याचे नाव<br>
**कोल्हापूर चित्पावन संघ**<br>
**(खाते क्र. 090210110016181)**<br>
**IFSC Code : BKID0000902**<br>
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/– मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# मालती दास्ताने

स्वातंत्र्यलढ्यात प्रत्यक्ष सहभाग घेऊन अनेक ब्रह्मवृंद माता भगिनींनी आपल्या आयुष्याचे समर्पण देशासाठी केले.

आजच्या काळात आजुबाजूला घडणाऱ्या घटनांनी मन खिन्न होते. तेव्हा वाटतं अशा किती तरी जणींनी देशासाठी आपले आयुष्य वेचले त्या आयुष्यांना आम्ही मनापासून अभिवादन करण्याची तरी आमची पात्रता आहे का? अशाच एका समर्पित आयुष्याची ही कथा.!!.

१९ नोव्हेंबर १९२४ साली मालतीचा जन्म कोल्हापुरात झाला. इयत्ता ७ वी पर्यंत त्यांचे शिक्षण कोल्हापुरातच झाले. वयाच्या १४ व्या वर्षापर्यंत त्या कोल्हापुरातच होत्या. त्यावेळी त्यांचे पितृछत्र हरपले, त्यांचे मोठे बंधू भाऊ धर्माधिकारी व नाना धर्माधिकारी हे दोघेही अनेक वर्षे गांधीजी, विनोबाजी यांच्या सहवासात होते. गांधीजींच्या आचार विचारांना त्यांनी वाहून घेतले होते. आपल्या छोट्या बहिणीला त्यानी आश्रमयी जीवनाचा परिचय व्हावा यासाठी वर्ध्याच्या महिला आश्रमात ठेवले. तेथेच १९४० साली विनोबांचे मानसपुत्र दत्तोबा दास्ताने यांच्याशी त्यांचा विवाह झाला! दास्ताने कुटुंबिय गांधी प्रणित चळवळीत अनेक वर्ष काम करीत होते. मालती व दत्तोबा या नवविवाहीत दांपत्याला विनोबाजीनी पवनार जवळच्या सुरगांव या गावांत काम करण्यासाठी पाठवले. या गावात विनोबा स्वच्छतेचे काम करण्यासाठी येत, काम करीत आणि मालतीच्या झोपडीतच ते विश्रांती घेत. ७ऑगस्ट १९४२ ला गांधीजींनी स्वातंत्र्य युद्ध पुकारल्याची बातमी आली. आपण काय करायला हवे, याची दास्ताने कुटुंबाला कल्पनाच नव्हती. त्यामुळे ते दोघे प्रथम विनोबांना भेटले आणि त्यांच्या परवानगीने या लढ्यात भाग घेण्याचा त्यांनी निर्णय घेतला. तेथून ते दोघे वर्ध्याला पोहचले. वर्धा येथील वातावरण आधीच तापले होते. मालतीच्या नणंदबाई सौ. शरयु धोतरे यांना अगोदरच पोलिसांनी पकडले होते. सौ. शरयुताई ऊर्फ आक्का यांनी १९४२ च्या अगोदर तीन वेळा तुरुंगवास भोगला होता. वर्धा येथे मालतीच्या सासूबाई सौ. पारुताई दास्ताने असल्यामुळे त्यांच्याकडेच राहण्याचा मालती व दत्तोबा यानी निर्णय घेतला. पण सौ. पारुताई जेथे राहत होत्या तो महिलाश्रम सरकारने जप्त केल्यामुळे, तेथे ज्या मुली रहात होत्या त्यांची राहण्या जेवणाची व्यवस्था जमनालालजी बजाज यांच्या बंगल्यावर केली होती.

वर्ध्यामध्ये १४४ कलम लागू होते. त्यामुळे ५ व्यक्ती फार तर एकत्र जाऊ शकत होत्या. ६ वी व्यक्ती त्या गटात आली तर लगेच पोलीस त्यांना तुरुंगात डांबत असत. रोज ५ मुली घोषणा देत व्याख्याने देत जायच्या. पोलीस गाडी त्यांच्या मागेच असायची. कधी त्या दिवशी किंवा दुस-या दिवशी त्यांना पकडून वर्धा जेलमध्ये ठेवत. कुस्करली तरी पुन्हा गोळा होईल अशी भाकरी नावाची वस्तू व कळकट पितळी पेल्पाच्या तळाशी ८-१० डाळीचे दाणे व पेलाभर काळे पाणी असलेले वरण जेवायला मिळत असे. त्यांच्या शिक्षिकांना आधीच पकडून तिथेच ठेवले होते.

स्वातंत्र्य लढ्याच्या बातम्या वर्तमान पत्रात येत असत. त्या मिळवून बुलेटीन काढले जाई. ते शहरात महत्वाच्या ठिकाणी चिटकवले जाई. हे काम फारच धोक्याचे होते. शिक्षाही जबरदस्त होती. बुलेटिन काढण्यासाठी बातम्या गोळा करणे, त्या लिहिणे, त्यांच्या प्रति काढणे, हस्ताक्षर ओळखले जाऊ नये म्हणून डाव्या उजव्या हाताने लिहणे. आपले ठिकाण कळू नये म्हणून रोज स्थलांतर करणे, इत्यादी कसरती कराव्या लागत त्यामुळे ही जबाबदारी खूपच जोखमीची होती. त्यांच्या पतीने आणि काही सहकाऱ्यांनी हे काम स्वीकारले. त्यांना बातम्या गोळा करण्यात, चिटकवण्यात व इतर

ठिकाणी पोहोचविण्यात काही भगिनी मदत करीत असत असे मालतीताई सांगतात. ते मंतरलेले दिवस असल्यामुळे अशी धोक्याची कामे करण्यास गौरव वाटायचा. मशीन व इतर साहित्य कोणाला संशय येणार नाही अशा वेगवेगळ्या ठिकाणे विंचवाच्या बि-हाडासारखे न्यावे लागे. कधी स्नानघरात तर कधी अडगळीच्या खोलीत, तर कधी संडासात बसून सुद्धा काम करावे लागत असे. त्यांकाळी सुद्धा फितुर लोक होते. ते पोलिसांना बरोबर माहिती देत. पण पोलिसांपैकीही काही जणांना ही काम करणारी माणसे देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतात, याची जाणीव असल्यामुळे आणि आमच्याबद्दल आत्मियता असणारे पोलीस धाड केव्हा पडणार याची आगाऊ माहिती सूचना देत असत. असेच एकदा पोलिसांची धाड आली असता मालतीताई आणि त्यांच्या सहकारी मुली व पतीला ही बातमी अगोदर समजली. त्यांमुळे दत्तोबानी मशीन, अन्य कागदपत्रे व साहित्य एका अडगळीच्या खोलीत लपवले. सभोवताली कचरा, अडगळीचे सामान पसरून ठेवले. पोलिसांची धाड आली. घरातील सगळ्या सामानाची विस्कटा विस्कट करुनही पोलिसांना काहीच लागले नाही. त्यामुळे ते खूप खवळले होते. त्यापैकी एकाची नजर माळ्यावरच्या अडगळीकडे गेली. दोन पोलीस वर चढले पण तेथील कुबट वास आणि घाणेरडे सामान बघून ते परतले. पण पुन्हा पोलीस येतील म्हणून दत्तोबांना पाऊण-एक तास त्या अडगळीतच रहावे लागते.

१४४ कलम मोडण्यासाठी जमनादास बजाजनी कोटेकोर नियम केले होते. ५-५ मुलींचा गट क्रमवारीनुसार निश्चित केला होता. मालती ताईंच्या गटाचा क्रमांक आला. मागे पोलिसांची व्हॅन होतीच. एका बंद असलेल्या दुकानाच्या पायरीवर उभी राहून समोर  जमा झालेल्या लोकांना उद्देशून भाषण देताना एक मुलगी म्हणाली, ''हातात झेंडा घेऊन मोठ्या उत्साहाने राष्ट्रीय गाणी गात रस्त्यावर उतरत, आमच्यासारख्या लहान मुली इंग्रज सरकारला घाबरत नाहीत. आणि तुम्ही असे घरात बसता? आमच्या हातातील बांगड्या तुमच्या हातात घाला.'' या भाषणाने प्रेरित होऊन लोकांनी गांधीजींचा व वंदे मातरमचा जयजयकार करण्यास सुरुवात केली. चिडलेल्या पोलीस अधिकाऱ्याने मोटार व्हॅनच्या इंजिनचा आवाज एवढा मोठा केला, की नंतर त्या मुलींचा आवाज लोकाना ऐकूच गेला नाही. दुसऱ्या दिवशी पोलिसानी मालती आणि तिच्या सहकाऱ्यांना पकडून वर्धा येथील जेलमध्ये नेले. जेलमध्ये पूर्वीच्या सहकारी मैत्रिणी आणि शिक्षिकांना ठेवले होते. अपुऱ्या जागेमुळे पकडलेल्या मुलीला दुसरीकडे हलवण्याचा आदेश आला. त्यांना नेण्यासाठी पोलीस आले असता आम्हाला कोठे नेणार हे प्रथम सांगा. अन्यथा आम्ही येणार नाही असे त्यांनी ठामपणे सांगितले. यापूर्वी पोलीस मुलींवर, स्त्रियांवर बलात्कार करतात, जंगलात सोडून देतात, असे ऐकले होते. त्यामुळे मुलींनीही निर्णय घेतला की एकटीला सोडून कुठे जायचे नाही. प्रसंग आला तर मरण स्वीकारायचे, पण शरण जायचे नाही. स्त्रिया अबला नाहीत त्या सबला आहेत, ते सिद्ध करून घ्यायचे हे त्यांनी मनोमन ठरवले. या सर्व मुलींना नागपूर जेलमध्ये हलवण्यात आले. योगायोगाने त्या जेलमध्ये मालतीताईची नणंद सौ. आक्का धोतरे समाजसेविका सौ. प्रमिलाताई ओक, त्यांच्या जाऊबाई, इत्यादी अनेक स्त्रिया होत्या. या मुलींना गुन्हेगार स्त्रियांच्या बराकीजवळच ठेवण्यात आले होते. स्त्रिया गुन्हेगारीकडे का वळतात याचीही त्यांना चांगलीच कल्पना आली. तुरुंगात पत्रे येत असत, पण ती पत्रे वाचली जाऊ नयेत म्हणून त्यावर डांबर फासलेले असे.

१३ महिन्यांनी मालतीताई तुरुंगाबाहेर आल्या. त्याच तुरुंगात असलेल्या त्यांच्या पतीची, दत्तोबांची सुटका दीड वर्षाच्या कारावासानंतर झाली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मालतीताई नागपूर, वर्धा करीत पुण्याला स्थायिक झाल्या. वर्धा पवनारपेक्षा

पुण्याचे वातावरण पूर्णत: भिन्न होते. सामाजिक आचार-विचार, पध्दती, लोकांची उद्दिष्ट्ये, त्यांच्या भाव-भावना, दिनक्रम आहार-विहार इत्यादी साऱ्याच गोष्टी पूर्णतः भिन्न होत्या. त्यामुळे मालतीताई नव्या वातावरणात गुदमरून गेल्या. पण गांधीजी विनोबाजींचा सहवास, त्यांची शिकवण त्या विसरू शकणार नव्हत्या. वय वाढत होते. बाहेर काम करणे शक्य नव्हते. तेव्हा लहान मुलांच्यावर चांगले संस्कार घडवण्याचा त्यांनी निर्धार केला. आपल्या आजू-बाजूच्या प्लॅटमधील मुलांना एकत्र करून त्यांना गीताई पाठ करण्यास शिकवले. या मुलानी शाळेतील सर्व मुलांच्या समोर गीताई सादर करण्यास सुरुवात केली. मालतीताईंच्या या अनोख्या उपक्रमाला अनेक शाळांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. वर्ध्यात मुलांना गीताईचा पाठ देण्यामध्ये त्या रमून जात. पण त्यांच्या मनातील खंत काही निराळीच असे.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मालतीताईंनी विधायक कार्यावर अधिक लक्ष दिले. विशेषतः लहान पिढी सुसंस्कारक्षम व्हावी, स्वच्छ आचार, स्वच्छ सुंदर व ध्येयवादी विचार आणि शक्यतो समाजापयोगी कृती करण्यासाठी त्यांच्या मनावर चांगले विचार बिंबवावेत, या हेतूने त्या उतार वयातही कार्यरत असायच्या. स्वातंत्र्यलढ्यात सर्वस्व अर्पण केलेल्यांकडे समाजाचा दृष्टिकोन चांगला नाही. वाढते अत्याचार, भ्रष्टाचार, स्त्रियांवर होणारे बलात्कार, त्याला कळत नकळत जोपासणारी टी.व्ही. वरील दृश्ये, अधिकाधिक संपत्ती मिळवण्यासाठी चाललेली नीतीशून्य भयानक राक्षसी धडपड, अशा अनेक गोष्टींबद्दल त्या दुःखी असत. चांगले समाजोपयोगी कायदे करून ते प्रत्यक्षात राबवण्यासाठी धडपडणाऱ्या लोकांबद्दल त्यांना नेहमी सहवेदना असे. विधायक गोष्टी सुचवताना त्या म्हणत, की निवडून गेलेल्या प्रत्येक लोकप्रतिनिधीने किमान एक खेडे दत्तक घेऊन तेथे अशी विधायक कामे करावी, की ज्यामुळे ते खेडे भारतीय लोकशाही बळकट आणि आदर्श होण्यास कारणीभूत ठरेल. मालतीताईंचे ते स्वप्न साकार होवो एवढीच मनोमन इच्छा!!!

**– वैदेही जोशी,**
मोबा. ९५४५६३५४६५

**दिनविशेष जून २०२६ पराभवनाम संवत्सरे** **सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**

**अधिक ज्येष्ठ-निज ज्येष्ठ १९४८-४९** **श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे । साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**




**सोमवार दि. १ :** जागतिक पालक दिन, **बुधवार दि. ३ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो. ९.४२ वा.), **शुक्रवार दि. ५ :** जागतिक पर्यावरण दिन, **शनिवार दि. ६ :** शिवराज्याभिषेक दिन, **बुधवार दि. १० :** जागतिक दृष्टिदान दिन, **गुरुवार दि. ११ :** साने गुरुजी स्मृती दिन, **सोमवार दि. १५ :** जागतिक मल्लखांब दिन, सोमवती अमावास्या, **बुधवार दि. १७ :** जिजामाता स्मृती दिन, महाराणा प्रताप जयंती, **गुरुवार दि. १८ :** राणी लक्ष्मीबाई पुण्यदिन, गुरुपुष्यामृत, **रविवार दि. २१ :** जागतिक योग दिन, दक्षिणायनारंभ, **शुक्रवार दि. २६ :** छ.शाहू महाराज जयंती, मोहरम (ताबूत विसर्जन), **शनिवार दि. २७ :** शिवराज्याभिषेक दिन (तिथी), **सोमवार दि. २९ :** वटपौर्णिमा, कर्नाटकी बेंदूर.

# रुद्र वीणेचा उलटा भैरव

लंका दहनच्या तिसऱ्या दिवशी, जेव्हा राख अजूनही गरम होती, विभीषणाने अशोक वाटिकेच्या मागील गुप्त कक्षाचे कुलूप उघडले. हे रावणाचे खाजगी ग्रंथालय होते. तिथे सोन्याच्या भिंती नव्हत्या, तर ताडपत्रे होती. दहा हजारांहून अधिक. त्यावर कोणतेही राक्षसी मंत्र नव्हते, तर सामवेदाचे स्वर, आयुर्वेदाची सूत्रे, नक्षत्र गणना आणि वीणेचे आलाप लिहिलेले होते.

एक तरुण राक्षस, जो मेघनादचा मुलगा अक्षय नसून त्याचा शिष्य 'तरणि' होता, त्याने विचारले, महाराज विभीषण, सगळे म्हणतात की दशानन अजिंक्य होता कारण त्याला ब्रह्मदेवाचे वरदान होते. त्याच्या शक्तीचे रहस्य हेच होते का?

विभीषण हसला, पण त्या हसण्यात थकवा होता. वरदान कवच देते, तलवार नाही. दादांच्या शक्तीचे रहस्य दहा डोक्यांमध्ये नव्हते, तर ती शक्ती दहा डोक्यांमध्ये विभागलेली होती.

**पहिले डोके – ऐकणारा (श्रोता)**

रावण पुलस्त्य ऋषींच्या कुळात जन्माला आला, तो जन्माने ब्राह्मण होता. वयाच्या दहाव्या वर्षी त्याने आपले वडील विश्रवा यांना विचारले, बाबा, राक्षस का घाबरतात? विश्रवा म्हणाले, कारण ते ऐकत नाहीत. तेव्हा रावणाने पहिले तप केले. तो हिमालयात गेला, कैलासाच्या छायेत बसला आणि त्याने शिवतांडव नाही, तर शिवाची शांतता (मौन) ऐकली. सात वर्षे त्याने फक्त ऐकले. वारा, पाणी, यक्षांची कुजबुज आणि मरणाऱ्या पशूंचा श्वास.

जेव्हा तो परतला, तेव्हा त्याच्याकडे पहिले डोके होते – श्रोता. तो कोणत्याही भाषेला एका क्षणात समजू शकत असे. देव, दानव, नाग, पशू म्हणूनच तो यमाशी युद्ध करू शकला, कारण त्याने यमाच्या रेड्याच्या थकव्याचा आवाज आधीच ऐकला होता.

लोकांनी म्हटले, रावणाला वरदान मिळाले. पण सत्य हे होते की त्याने ऐकण्याची तपश्चर्या केली होती.

**दुसरे डोके – गाणारा (गायक)**

दुसरे रहस्य होते त्याची वीणा, रुद्र वीणा. रावणाने शिवाला प्रसन्न करण्यासाठी आपली शिरे कापली, ही कथा सर्वांना माहित आहे. पण ती शिरे कापणे म्हणजे बळी नव्हता, तर तो एक स्वर होता.

प्रत्येक वेळी जेव्हा तो आपले शीर अर्पण करायचा, तेव्हा त्याच्या नाडीतून एक नवीन स्वर निघायचा. नऊ वेळा त्याने हे केले. दहाव्या वेळी शिवाने त्याचा हात धरला आणि म्हणाले, बस कर. तू मृत्यूला संगीत बनवले आहेस.

त्या दिवसापासून रावणाच्या कंठात अशी शक्ती आली की तो सामवेद उलट्या क्रमाने गाऊ शकला. उलटा सामवेद मृत्यूला रोखत नाही, तर तो वेळेला (काळ) संथ करतो. म्हणूनच लंकेत घड्याळ हळू चालायचे. राक्षस शंभर वर्षे तरुण राहायचे.

विभीषणने एक ताडपत्र उचलले. त्यावर 'राग भैरव' उलटा लिहिलेला होता. दादा रोज पहाटे हे गायचे. ते म्हणायचे, शक्ती मारण्यात नाही, तर थांबवण्यात (ठहरने में) आहे.

**तिसरे डोके – गणना करणारा (गणितज्ञ)**

रावण ज्योतिषी होता, पण फलित नाही तर गणिताचा जाणकार. त्याने लंकेचा पाया अशा मुहूर्तावर रचला जेव्हा शनि वक्री होता. सर्वांनी त्याला अपशकुन मानले. तो म्हणाला, वक्री ग्रह मागे बघतो. जो मागे बघतो, तो कधीच पडत नाही.

त्याने नवग्रहांना बंदी बनवले, हे देखील अर्धसत्य आहे. त्याने त्यांना बंदी नाही, तर ओलीस (बंधक) ठेवले होते. प्रत्येक ग्रहाकडून त्याने एक सूत्र घेतले. मंगळाकडून धातुशास्त्र, बुधाकडून भाषा आणि शुक्राकडून संजीवनीचे अपूर्ण सूत्र.

त्याचे दहावे डोके हेच होते – संग्रहकर्ता. त्याला माहित होते की ज्ञान वाटल्याने कमी होत नाही, पण साठवून ठेवल्यास ते कुजते. त्याने ते रोखून धरले. लंकेचे ग्रंथालय जगातील सर्वात मोठे होते, पण त्याचे द्वार बंद होते.

**चौथे रहस्य – अहंकार नाही, तर भीती**

तरणिने विचारले, मग त्यांचा पराभव का झाला? विभीषणने राखेवर हात फिरवला. कारण त्याने दहा डोक्यांना कधीच एकत्र ऐकले नाही.

रावणाची खरी शक्ती त्याची 'एकाग्रता' होती. तो एका वेळी एकाच डोक्याने विचार करायचा. युद्धात तो योद्धा, यज्ञात ब्राह्मण, दरबारात राजा आणि वीणेवर कलाकार. पण जेव्हा त्याने सीतेचे अपहरण केले, तेव्हा पहिल्यांदाच त्याची दहाही डोकी एकाच वेळी बोलू लागली.

एकाने म्हटले, हे अधर्म आहे. दुसऱ्याने म्हटले, हा प्रतिशोध आहे. तिसऱ्याने म्हटले, हे प्रेम आहे. चौथ्याने म्हटले, ही परीक्षा आहे. पाचव्याने म्हटले, ही नियती आहे. तो ऐकू शकला नाही. त्याने ऐकणे बंद केले होते. ज्या दिवशी त्याने आपल्या 'श्रोता' डोक्याला गप्प केले, त्याच दिवशी शिवाने दिलेला स्वर तुटला.

लोक म्हणतात रामाचा बाण नाभीवर लागला. नाभीत अमृत होते, ही देखील एक कथा आहे. सत्य हे आहे की नाभी ही अशी जागा आहे जिथून आवाज निघतो. रावणाच्या नाभीत तो पहिला स्वर शिल्लक होता जो त्याने कैलासावर ऐकला होता. रामाने त्याला मारले नाही, तर त्याला मुक्त केले.

बाण लागताच रावण हसला. विभीषणने ते पाहिले होते. अंतिम क्षणी दहाही डोकी एकाच वेळी शांत झाली आणि पहिल्यांदाच तो पूर्णपणे ऐकू शकला – आपल्या आतील मौन.

त्याने रामाला सांगितले, मला ब्राह्मणाप्रमाणे अग्नी द्या. तो वरदान मागत नव्हता, तर तो आपली खरी ओळख आठवून देत होता.

**रहस्याचा अंत**

विभीषणने ताडपत्रे गुंडाळली आणि म्हटले, दादांची शक्ती तप होते, संगीत होते, गणित होते. पण शक्तीचे रहस्य हे नाही की तुम्ही किती गोळा करता. रहस्य हे आहे की तुम्ही किती सोडू शकता.

त्याने देवांकडे अमरत्व मागितले, ब्रह्मदेव नाही म्हणाले. त्याने मनुष्य आणि वानरांना सोडून दिले, कारण त्याला वाटले ते तुच्छ आहेत. तीच 'सुटलेली' गोष्ट त्याला घेऊन बुडाली. शक्ती जेव्हा ठरवते की कोणाला लहान समजायचे, तेव्हाच ती आंधळी होते.

तरणिने विचारले, तर मग रावण वाईट होता का? विभीषणने उत्तर दिले नाही. त्याने कोपऱ्यात ठेवलेली वीणा उचलली. तिची एक तार तुटलेली होती. त्याने ती छेडली. एक बेसुरा आवाज आला.

वाईट नाही, अपूर्ण होता. दहा डोकी असण्याचा अर्थ दहा वेळा विचार करणे नाही, तर एकदा दहाही जणांचे ऐकणे आहे. तो हे कधीच करू शकला नाही.

बाहेर लंकेत नवीन सकाळ होत होती. राखेवर अंकुर फुटत होते. विभीषणने ग्रंथालयाचे द्वार उघडले. पहिल्यांदाच लंकेची मुले आत आली, त्यांनी ताडपत्रांना स्पर्श केला, स्वर वाचले. आणि तेव्हा, असे म्हणतात की, हवेत कुठेतरी दूरवरून रुद्र वीणेचा उलटा भैरव पुन्हा ऐकू आला, पण यावेळी तो काळ संथ करणारा नव्हता, तर मुक्त होता. जणू एखादा जुना श्रोता शेवटी स्वतःचेच गीत ऐकत असावा.

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत. तसेच ज्यांना नवस्नेहचा अंक मिळाला नसेल त्यांनी संघ कार्यालयात कळवावे. त्यांना अंकाची पीडीएफ व्हॉटस्ॲपवर पाठविली जाईल.**

### शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

## (लेखांक चाळिसावा)

लौकिक अर्थानं, पारमार्थिक अर्थानं, आध्यात्मिक अंगानं आणि ज्ञानसंपादनानं ही चौघंही मोठी होत होती; पण ती जितकी समाजाभिमुख होत गेली, तितका त्यांचा स्वशी संवाद वाढत होता. स्वअध्ययन वाढत होतं. सोपानाही त्याला अपवाद नव्हता. उलट ज्ञानादादा जेवढा अधिकाधिक समाजाभिमुख होत होता, सोपान तेवढाच अंतर्मुख होत होता. अध्यायी बनत होता. स्व-संवेदी बनत होता.

एक मात्र झालं, की ज्ञानादादाची कीर्ती सर्वदूर पसरली आणि त्याला भेटायला येणाऱ्यांची वर्दळ सुरू झाली. आसपासच्या गावातले प्रतिष्ठित आणि भगवद्भक्त यांच्याबरोबरच अगदी सामान्यातल्या सामान्य माणसांपर्यंत सगळ्यांना ज्ञानादादाला भेटायचं असायचं. त्याच्याबरोबरच ती सगळी जण निवृत्तीदादाला, सोपानाला आणि मुक्ताईलाही भेटत.

यातच एक दिवस पंढरपुराहून नामदेव म्हणून कोणी भेटायला आले. हे नामदेव मोठे भगवद्भक्त होते. त्यांना विठ्ठलाचा सखा म्हणत असत. उंच, शिडशिडीत बांध्याचे, पगडी घालणारे, निर्मळ मनाचे नामदेव दामाशेटीचे चिरंजीव होते. त्यांच्या घरात वारी होती. भक्त पुंडलिकानं स्थापित केलेला वारकरी धर्म ते पाळत असत. म्हणूनच जाती-धर्माच्या पलीकडे त्यांचे विचार होते. सर्व समावेशक असलेला, 'वसुधैव कुटुम्बकम' मानणारा वारकरी धर्म, म्हणजे विठ्ठलभक्तांची मिरास होता; पण भक्त पुंडलिकाच्या महानिर्वाणानंतर हा वारकरी धर्म काहीसा पुसट झाला होता. त्यातच चक्रधरांच्या महानुभाव पंथानं जोर धरला होता. त्यामुळे या वारकरी संप्रदायाला, भागवत धर्माला काहीशी उतरती कळा लागली होती. खरंतर घराघरात वारकरी होते. घराघरांत विठ्ठलभक्त होते; पण त्यांची एकतानता नव्हती. एकसंघता नव्हती. ज्ञानादादाची कीर्ती वाढत होती. त्याला भेटायला येणाऱ्यांची वर्दळही वाढत होती. चर्चा-उपचर्चा होत होती. वाद-संवाद होत होते. प्रश्न-उत्तरं झडत होती; पण यातून ठोस काहीतरी पुढे येत नव्हतं. म्हणून ज्ञानादादा अस्वस्थ होता. ती त्याची अस्वस्थता सोपानानं ओळखली.

एके दिवशी रात्री जेवणं झाल्यावर चौघं जण अंगणात चांदण्यात बसले होते आणि सोपानानं विचारलं, ''ज्ञानादादा, गेले कित्येक दिवस मी पाहतोय, तू अस्वस्थ आहेस. विमनस्क आहेस. काही घडलंय का?'' सोपानाच्या स्वरात चिंता होती. ज्ञानादादा किंचित हसला, म्हणाला, ''नाही रे सोपाना, तसं विशेष काही नाही; पण काहीतरी मोठं, काहीतरी ठोस असं समाजाच्या कल्याणाचं काही घडत नाहीये. सनातन वैदिक धर्मानं कर्मकांडाचा केलेला अतिरेक सामान्यजनांचा छळ करतोय. मनात असूनही त्यांना देवभक्ती करता येत नाही. त्यांचा कोंडमारा होतोय आणि ते बघून माझा जीव घुसमटतोय. असं काहीतरी करायला पाहिजे, की ज्यायोगे या समाजातले जातिभेद, धर्मभेद तर मिटतीलच; पण या कर्मकांडांना टाळून त्यांना देवभक्ती करता येईल; पण काय करावं सुचत नाहीय. म्हणून मी थोडासा अस्वस्थ आहे. असो. पण सोपाना तू दोन दिवसांपूर्वी मला काहीतरी सांगणार होतास. या भेटीला येणाऱ्या मंडळींमुळे मला तुझ्याशी निवांत बोलताच आलं नाही. काय सांगणार होतास तू?'' ज्ञानादादानं विचारलं आणि सोपानाला एकदम आठवलं. उत्साहित स्वरात तो म्हणाला, ''बसवेश्वर! श्री गुरु बसवेश्वर ! दादा, शतकापूर्वी

बसवेश्वर नावाच्या महात्म्यानं लिंग पूजेचं महत्त्व विशद केलं आणि वीरशैव पंथाला नवी दिशा दिली. चक्रधर स्वामींनी महानुभव पंथाची स्थापना करून एक नवीन संप्रदाय समाजात रूढ केला. ते वाचत असताना दादा, मला एकदम असं वाटलं, की असं काहीतरी नाही का घडू शकत? हेच मी तुला सांगणार होतो!'' सोपानाचं बोलणं ऐकून ज्ञानादादाचे डोळे चमकले. चेहऱ्यावर प्रसन्न हास्य उमटलं. ''सापडला सोपाना, मार्ग सापडला ! काहीतरी ठोस, मजबूत, कायमस्वरूपी टिकणारं असं करण्याचा मार्ग सापडला. सोपाना, मार्ग सापडला ! माझ्या मनातला अंधार नष्ट झाला आणि तिथं स्वच्छ सूर्यप्रकाश पसरलाय!'' ज्ञानादादाचा उत्साह ओसंडून वाहत होता. सोपानालाही आनंद झाला. तोच ज्ञानादादा म्हणाला, ''ठरलं सोपाना ठरलं! भक्तश्रेष्ठ पुंडलिकानं स्थापन केलेला वारकरी संप्रदाय जो आज काहीसा झाकोळून गेलाय, त्याला आपण पुन्हा उजाळा देऊ या. भगवान श्रीकृष्णानं भगवद्गीतेत सांगितलेली 'वसुधैव कुटुम्बकम' ची संकल्पना आपण समाजात रूढ करू या. वारकरी संप्रदायाला प्रतिस्थापित करणारा भागवत धर्म आपण पुनरुज्जीवित करू या ! नव्यानं उजळू या. ठरलं सोपाना ठरलं! या सनातन वैदिक धर्मसंस्थेला सुधारणांचं वावडं आहे. धर्मशास्त्राप्रमाणे कर्मकांड हेच आणि हेच त्याचं ध्येय आहे. त्यात कालानुरूप परिवर्तन करायला ते तयार नाहीत. ठीक आहे! तर मग आपण भागवत धर्माच्या झेंड्याखाली एकत्रित येण्याचं बहुजन समाजाला आवाहन करू या. धर्म, पंथ, वंश, जात या पलीकडे जाणारा मानवधर्म हाच आपल्या आवाहनाचा विषय असेल. आता जे काही करायचं, ते या मानवधर्मासाठीच ! या मानवधर्माला नजरेसमोर ठेवूनच. सोपाना, आपल्याला आपलं उद्दिष्ट गवसलंय! जगण्याचं कारण सापडलंय! जीवितकार्य सापडलंय!'' ज्ञानादादा उचंबळून बोलत होता. त्याच्या प्रसन्न चेहऱ्यावरून आनंद ओसंडून वाहत होता. सोपानाचे खांदे धरून त्याला गदागदा हलवत ज्ञानादादा बोलत होता. त्याचं ते हर्षभरित रूप सोपान आपल्या नजरेनं साठवत होता. कितीतरी दिवसांनी, आज कितीतरी दिवसांनी ज्ञानादादाचा असा प्रसन्न चेहरा सोपाना बघत होता. ईप्सित साध्य गवसल्याचा जणू त्याला आनंद झाला होता. त्याच्या प्रसन्नतेनं सोपानही प्रसन्न झाला. अतिप्रसन्न झाला. त्याच प्रसन्नतेनं त्याला झोप लागली.

दुसरे दिवशीची सकाळ मोठी प्रसन्न होती. पंढरपूरहून नामदेव, जनाबाई आणि त्यांच्यासोबत चोखोबा, सावता, गोरोबाबाकाका इत्यादी मंडळी आली. निवृत्तीदादानं त्यांचं स्वागत केलं. संतांचा हा मेळा आपल्या अंगणात जमलेला बघून सगळ्यांना अतिशय आनंद झाला. मुक्ता त्यांचं आगतस्वागत करण्यात गुंगली, तर जनाबाई लगेच तिच्या मदतीला धावल्या. सगळ्यांनी निवृत्तीदादा, ज्ञानादादाच्या चरणांवर डोकं ठेवून त्यांना नमस्कार केला. सोपानाला गळामिठी घालून त्याची उराउरी भेट घेतली. सगळी मंडळी झोपडीच्या अंगणात गोल करून बसली. तोवर मुक्तानं जनाबाईंच्या मदतीनं बनवलेले दहीपोहे द्रोणांतून भरून आणून प्रत्येकाच्या समोर ठेवले. बरोबर भाजलेल्या शेंगा होत्या. लसूण-मिरचीचा ठेचा होता. असा सगळा बेत बघून संतमंडळीही आनंदली. खाता-खाता गप्पांना जोर आला. वेगवेगळे विषय निघू लागले. तोच चोखोबांनी भीत-भीत विचारलं, ''माउली, एक गोष्ट इचारायची आहे. तुमची आज्ञा असंल, तर इचारीन म्हणतो!'' चोखोबाचा किंचित भ्यायलेला स्वर, प्रश्न विचारतानाची संकोचली अवस्था, तरीही नजरेतली उत्सुकता बघून त्यांना काय विचारायचे आहे, हे ज्ञानादादानं ओळखलंच. ''चोखोबा, मला समजलंय तुम्हाला काय विचारायचं आहे ते? आम्ही ब्राह्मण असूनही विटाळ मानीत नाही, स्पृश-अस्पृश्यता हा भेद पाळत नाही, तुम्हा सर्वांसवे बसतो, बोलतो, खातो, जेवतो, हे कसं काय? असंच ना तुम्हाला विचारायचं आहे?'' चोखोबांनी मूकपणे होकारार्थी मान डोलावली. ज्ञानादादा पुढे म्हणाला. ''मंडळी, आज हेच तुम्हाला सांगण्यासाठी मी उत्सुक आहे. खरंतर मी हे वेगळं किंवा वेगळेपणानं सांगायची

गरजच नाही. कारण ते तुमच्याजवळच आहे. तुमचंच आहे. फक्त त्याची तुम्हाला जाणीव नाही किंवा माहिती नाही. म्हणूनच ते मी तुम्हाला सांगावं, असं त्या गोपालकृष्णाच्या मनात असावं. नामदेवा, इथं तुम्ही जे सगळी जमला आहात, त्या सर्वांच्या घरी पंढरीची वारी करण्याची प्रथा आहे ना? परंपरा आहे ना? मग हे सगळं तुम्हाला नक्की समजेल. ते समजलं, की मात्र ती एका नव्या युगाची नांदी ठरेल. एका नव्या युगाची सुरुवात असेल!''

ज्ञानादादा बोलत होता आणि सगळ्यांचं अवधान जणू ज्ञानादादाच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या शब्दांवर एकवटलं होतं. शांतता इतकी होती, की शेवग्याच्या झाडाचं पानं पडलं, तरी आवाज ऐकू येईल आणि त्या शांततेत केवळ ज्ञानादादाचाच पार अगदी हृदयापर्यंत पोहोचणारा, स्नेहसुधा वर्षणारा आवाज ऐकू येत होता. सोपान एकटक ज्ञानादादाकडे पाहत होता. 'योगसामर्थ्याची अपरिमित साक्ष असलेला दादा प्रत्येक वेळी वेगळाच भासतो.' सोपानाच्या मनात आलं आणि त्याला आठवला काही दिवसांपूर्वीचा प्रसंग.

महान हटयोगी चांगदेव भेटायला येत आहेत असा निरोप आला. त्यांच्या अमाप भक्तगणांसह ते येत असून, ते स्वतः वाघावर स्वार आहेत, हे कळल्यावर मुक्ता म्हणाली होती, ''दादा, ते वाघांवर बसून येत आहेत, मग आपण त्यांना पायी-पायीच सामोरं जायचं?'' हा संवाद चाललेला असताना चौघंही जण एका घराच्या पडक्या भिंतीवर बसले होते. दादा म्हणाला होता, ''बरोबर आहे मुक्ते तुझं! आपण या भिंतीवरच स्वार होऊन जाऊ या!'' आणि त्यानं भिंतीला आदेश दिला होता. 'चल बाई. आम्हाला घेऊन चल!' आणि ती भिंत चालू लागली होती. ते बघून चांगदेव दादाला शरण आले होते. सर्वांना आश्चर्य वाटलं होतं, पण निवृत्ती-सोपान-मुक्ता शांत होते. या देहामध्ये चैतन्य नसेल, तर तो देह, तो अचेतन देह एखाद्या भिंतीप्रमाणेच असतो; पण त्यात प्राणतत्त्व भरलं, चैतन्य भरलं, की तो देह सचेतन होतो आणि सर्व क्रिया करू लागतो. तद्वतच अचेतन असलेल्या त्या भिंतीमध्ये, जड असलेल्या त्या भिंतीमध्ये चेतना भरल्यावर ती जड भिंतही सचेतन झाली आणि चालू लागली. प्राणतत्त्वाचं हे सामर्थ्य चौघंही जाणून होते; पण ज्ञानादादानं योगशक्तीवर विलक्षण सामर्थ्य मिळवलं होतं. म्हणूनच त्या अचेतनं भिंतीमध्ये तो चैतन्य भरू शकला. अर्थात ज्ञानादादाच्या योगसामर्थ्याची ही साक्ष तर होतीच; पण हटयोगावर प्रचंड हुकूमत असूनही केवळ अहंकारानं ती विद्या काळवंडलेला चांगदेवांच्या अहंकारावरचा तो उताराही होता.

''काय सोपाना, तुझं काय म्हणणं आहे यावर?'' ज्ञानादादाच्या या प्रश्नानं सोपान भानावर आला. त्याचं मन एकीकडे विचार करत असलं, तरी त्याची बुद्धी ज्ञानादादाच्या बोलण्याकडे लागलेली होतीच. म्हणूनच ज्ञानादादाच्या प्रश्नाला सोपानानं अचूक आणि नेमकं उत्तर दिलं, ''ज्ञानादादा, भक्तिसंप्रदायाला, भगवद्भक्ताला, त्याच्या भक्ती परंपरेला एक वेगळं अधिष्ठान यातून मिळणार आहे, हे निश्चित. तेव्हा तुझा हा विचार अत्यंत नेमका आणि सयुक्तिक आहे.'' सोपानाचं उत्तर ऐकलं आणि तिथं जमलेली संतमंडळी चकित झाली. सोपान वेगळ्या विचारात होता, हे त्यांनी पाहिलं होतं. तरीही त्यानं माउलीच्या प्रश्नाला नेमकं सयुक्तिक उत्तर कसं दिलं, याचं त्यांना नवल वाटलं. तोच ज्ञानादादा म्हणाला, ''उत्तम! सोपाना, तू अगदी माझ्या मनातलं बोललास. तेव्हा आता ठरलं! भगवद्भक्ताला आणि वारकरी परंपरेला एक वेगळं अधिष्ठान मिळवून देण्यासाठी योग्य ठिकाण पंढरपूर! श्रीविठ्ठलाच्या रूपातला तो गोपालकृष्णही तिथं आहे. त्याच्या संमतीनं आणि साक्षीनं हे साध्य करू या!'' ज्ञानादादानं समारोप केला आणि पुन्हा एकवार गळाभेट घेऊन मंडळींनी एकमेकांचा निरोप घेतला, तो पुढची भेट पंढरपुरात, असा निश्चय करूनच !

(क्रमशः)

**– सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००

# सोपानदेवांची ‘अलौकिक सोपानदेवी’

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्भगवद्गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे. **– व्यवस्थापक**

**अध्याय ९ : राजविद्या राजगुह्ययोग**

**तीन वेद ज्ञाने सोमपान करिती । स्वर्ग लोक पावावया याग होमिती । तेणें पुण्यें क्षीणें इहलोक पावती । दिव्य देवभोग भोगुनी ।। ते पुरुष स्वर्गी वास करिती । क्षीणें पुण्यें मृत्यु लोकां येती । जे धर्मयज्ञ आचरती । तया गमनागमन असे ।।**

त्या स्वर्गातें भोगुनी ते विशाळ । क्षीणें पुण्यें मृत्यु-
लोकास येती । ऐसे निष्ठा ठेवुनी वेद-धर्मी
येणे-जाणें जोडिती काम-मूढ ।।२१।।

**आणिके ठायीं मन न घालिती । माझें चिंतन उपासना करिती । त्याचा योगक्षेम निश्चिती । मी चालविता होय ।।**

अनन्य-भावें चिंतूनि भजती भक्त जे मज ।
सदा मिसळले त्यांचा मी योग-क्षेम चालवी ।।२२।।

**अन्य देवतांचें ठायी । श्रद्धापूर्वक भक्ति करिती पाही। ते ही माझी भक्ती अन्यथा नाहीं । परि विधिपूर्वक नव्हे।।**

श्रद्धा-पूर्वक जे कोणी यजिती अन्य दैवतें ।
यजिती ते हि मातें चि परी मार्गास सोडुनी ।।२३।।

**मी सर्व यज्ञांचा भोक्ता । आणि मी सर्वांचा अधिष्ठाता । तत्त्व माझे नेणती मज न पावता । ते चेवती जाण ।।**

भोक्ता मी सर्व यज्ञांचा फल-दाता हि मी चि तो ।
नेणती तत्त्व हें माझे म्हणूनि पडती चि ते ।।२४।।

**देव पितृ आराधना करिती । आणि क्षुद्र देवताते भजती । ते जन त्या लोकांते पावती । मज भजती तें पावती मातें ।।**

देवांचे भक्त देवांस पितरांचे तयांस चि ।
भूतांचे भक्त भूतांस माझे हि मज पावती ।।२५।।

**पत्र पुष्प फळ उदक । मज देती भक्तिपूर्वक । ते मी अंगिकारी एक । ते मज पावे प्रीतीनें ।।**

पत्र वा पुष्प जो प्रेमें फळ वा जळ दे मज ।
ते त्या पवित्र भक्ताचे अर्पिलें खाय मी सुखे ।।२६।।

**अर्जुना जी नाना कर्में करिसी । जे अग्नीचे ठायी होमिसी । जें तप आचरसी । तें करी मज अर्पण ।।**

जे खासी होमिसी देसी जे जे आचरिसी तप ।
जे काही करिसी कर्म तें करी मज अर्पण ।।२७।।

**येणे करुनी शुभाशुभ फळ । कर्मबंधने तुटती सकळ । संन्यासयुक्त होउनि निर्मळ । मज पावशील ।।**

अशाने तोडुनी सर्व कर्म-बंध शुभाशुभ ।
योग-संन्यास सांधूनि मिळसी मज मोकळा ।।२८।।

**सर्व भूतांच्या ठायी । मी समबुद्धी असे पाही । मज वैरी मित्र तोही । समचि असे ।।**

जे मज भक्ति करुनी । भजती तत्पर जाणोनी ।
त्याचे ठायी मी असे सत्य मानी । ते असती माझ्या ठायी ।।२९।।


# मुलांचे पान




» चित्र रंगवा



## » फरक ओळखा



## » ठिपके जोडून चित्र तयार करा



# अधिक मास

**(लेखांक ११)**

१७ मे २०२६ ते १५ जून २०२६ या दरम्यान अधिक ज्येष्ठ मास आहे. अधिक महिना म्हणजे कोणतोही शुभ कार्य न करता धर्मकृत्य, दानधर्म, परमेश्वराची आराधना करून पुण्य मिळवण्याची पर्वणी असं मानलं जातं. अशा या अधिक महिन्याचं विशेष ज्ञान म्हणजे विज्ञान समजून घेऊया. किचकट नियम, सिद्धांत, सूत्र म्हणजे विज्ञान नव्हे, तर भावनेच्या आहारी न जाता, तर्कसंगतीने कोणत्याही गोष्टीच्या मुळाशी जाऊन त्यामागे लपलेलं मुलभूत सत्य शोधणं म्हणजे विज्ञान.

एकदा राजगोपालाचारी म्हणाले होते, ''धर्माशी निगडीत कोणतीही गोष्ट करताना हे करा, ते करू नका, ते खा, ते खाऊ नका, हे केलं तर पाप लागेल, असं केलं तर पुण्य लागेल, इ. सांगितलं जातं. पण हे का सांगितलं याच्या मुळाशी जाऊन आम्ही कधी विचार करणार आहोत की नाही? हजारो वर्षांपूर्वी आमच्या पूर्वजांनी निर्माण केलेला अधिक महिना त्यांची विज्ञानानिष्ठा, बिनचूक गणित आणि सखोल खगोलशास्त्राचा अभ्यास दाखविते.

कालगणना हा मानवी जीवनाचा फार मोठा आधार आहे. दिवस, आठवडा, महिना, वर्ष, दशक, शतक, सहस्त्रक अशी चढत्या क्रमाने कालगणना सुरू आहे. या पृथ्वीला प्रकाशरूपी ऊर्जा देणारे सूर्य आणि चंद्र यांचा या कालगणनेशी अत्यंत निकटचा संबंध आहे. चंद्र पृथ्वीला प्रदक्षिणा घालतो, पृथ्वी स्वत:भोवती फिरत सूर्याला प्रदक्षिणा घालते, त्यामुळे साहजिकच चंद्रालाही सूर्य प्रदक्षिणा घडते. यामुळे अमावास्या-पौर्णिमेचे चक्र सुरू राहते, दोन अमावास्यामधील कालावधी म्हणजे एक चांद्रमास. चांद्रमास २९ ते २९।। दिवसांचा असतो.

पृथ्वीला सूर्याभोवती प्रदक्षिणा पूर्ण करण्यास लागणारा कालावधी म्हणजे जानेवारी पासून डिसेंबर अखेरचे बारे महिन्यांचे एक सौर वर्ष. एका सौर वर्षामध्ये ३६५ दिवस, ५ तास, ४४ मिनिटे आणि सुमारे ४६ सेकंद असतात. ५ तास ४४ मिनिटे आणि ४६ सेकंदांचा फरक दर चार वर्षांनी येणाऱ्या लीप वर्षाच्या आधारे भरून काढला जातो. चंद्राला पृथ्वी प्रदक्षिणा पूर्ण करण्यास सुमारे ३५४ दिवस लागतात. चैत्र ते फाल्गुन हे चांद्रवर्षाचे बारा महिने. भारतीय पंचांग हे एकाच वेळी सौरवर्ष आणि चांद्र वर्ष यांची सांगड घालते. प्रत्येक चांद्रवर्ष आणि सौरवर्ष यामध्ये सुमारे ११ दिवसांचा फरक पडतो. या फरकाचा मेळ घालण्यासाठी अधिक महिन्याची योजना केली आहे.

सौरवर्ष आणि चांद्रवर्ष यांची सांगड का घातली पाहिजे? आपले सण चांद्रवर्षाप्रमाणे होतात. आपले सर्व सण हे ऋतूशी निगडीत ठेवले आहेत. त्यानुसार या सणात आहाराची योजना केली आहे. पृथ्वीच्या सूर्याभोवती प्रदक्षिणा घालण्यामुळे ऋतू होतात. सण आणि ऋतू यांचा मेळ बसविण्यासाठी सौरवर्ष आणि चांद्रवर्ष यांची सांगड भारतीय संस्कृतीने, ज्योतिषशास्त्राने, खगोलशास्त्राद्वारे घातली गेली आहे. आपला संक्रांत सण पौष महिन्यात आणि जानेवारीच्या १२ ते १४ तारखेलाच येणार. पुढे येणाऱ्या उन्हाळ्याला सामोरे जाण्यासाठी बाजरी, तीळ, गूळ इ. चा आहारात समावेश केला जातो. पावसाळ्याच्या अखेरीस अंधाऱ्या रात्री चंद्र प्रकाशाने उजळू लागला की कोजागिरीचा उत्सव. पाठोपाठ निसर्गाप्रमाणेच अंधरातून प्रकाशाकडे जात रहा हे सांगणारा नवरात्र आणि दिपोत्सव. या कालावधीत येणारे शरद आणि हेमंद ऋतूत गोडधोड आणि भरपूर स्निग्ध पदार्थ आहारांत समाविष्ट करून आरोग्यवर्धन केलं जातं. वसंत ऋतूच्या चाहुलीनं निसर्ग रंगीबेरंगी होऊ लागला की रंगपंचमी. ऋतू, आहार आणि आपले सण यांचं नातं अतूट ठेवण्यासाठी चंद्रांची पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घालण्याची गती, पृथ्वीची सूर्याभोवती प्रदक्षिणा

घालण्याची गती यांचा सखोल अभ्यास करून अधिक महिन्याचं गणित सोडवलं जातं.

सूर्य, चंद्र, पृथ्वी हे ग्रह या अंतराळात आहेत. पृथ्वीच्या सूर्याभोवती फिरण्याच्या गोलाकार मार्गाचे १२ काल्पनिक भाग केलेले आहेत. प्रत्येक भाग म्हणजे एक राशी. यानुसार मेष ते मीन अशा १२ राशी आहेत. या भ्रमणमार्गात असलेल्या २७ तारका समूहांना, २७ नक्षत्रे मानले जाते. या नक्षत्रावाटे राशी अधोरेखित केल्या जातात. आपण सूर्य धनू राशीतून मकर राशीत गेला असे म्हणतो. वास्तविक सूर्य स्थिर आहे. पृथ्वी फिरते. पृथ्वीवरून पाहिले असता सूर्य विशिष्ट राशीत दिसतो. पृथ्वी पुढे गेली की, पृथ्वीवरून सूर्य पुढील राशीत दिसतो. पण बोलताना सूर्याचे राश्यांतर किंवा राशीबदल असे म्हटले जाते. जेवढी भ्रमणकक्षा किंवा भ्रमणमार्ग लहान तेवढे राश्यांतर सावकाश किंवा अधिक कालाने होते. चंद्राला एका राशीतून दुसऱ्या राशीत जाण्यात २ ते २। दिवस लागतात आणि सूर्याचे राश्यांतर किंवा राशीसंक्रमण होण्यास सुमारे एक महिना लागतो. म्हणजे राशी हा चंद्र, सूर्य (पृथ्वी) यांच्या भ्रमण कक्षेचा समान धागा किंवा भाग आहे आणि याद्वारेच अधिक महिना ठरवला जातो.

चैत्र ते फाल्गुन हे चांद्रवर्षाचे १२ महिने. पौर्णिमेच्या दरम्यान चंद्र ज्या नक्षत्रात असतो, त्यावरून चांद्रमासाची नावे दिली आहेत. पौर्णिमेच्या दरम्यान चंद्र चित्रा नक्षत्रात म्हणून चैत्र महिना, याप्रमाणे विशाखा, ज्येष्ठा, पूर्वाषाढा, श्रवण, पूर्वाभाद्रपदा, अश्विनी, कृतिका, मृगशीर्ष, पुष्य, मघा, पूर्वाफाल्गुनी या नक्षत्रांवरून वैशाख, ज्येष्ठ, आषाढ, श्रावण इ. पुढील महिन्यांची नावे दिली आहेत. परंतु अधिक महिन्यात हे वैशिष्ट्य आढळत नाही. आता या वर्षीच्या अधिक ज्येष्ठ महिन्यात पौर्णिमेला चंद्र अनुराधा नक्षत्रात आहे आणि निज ज्येष्ठात तो पौर्णिमेला ज्येष्ठा नक्षत्रात आहे.

प्रत्येक चांद्रमासात सूर्य हा विशिष्ट राशीतच असतो. चैत्र–मीन रास, वैशाख–मेष रास, ज्येष्ठ–वृषभ, मिथुन, कर्क... आणि फाल्गुन–कुंभ रास. यावरून अधिक महिना ठरवला जातो. आता यंदाचेच उदाहरण घेऊया. १५ मे रोजी पहाटे ५.१२ मि. अमावास्या सुरू झाली. याच दिवशी सूर्य वृषभ राशीत गेला. म्हणजे ज्येष्ठ महिना सुरू. पुढची अमावास्या १४ जूनला दुपारी १२.२१ नंतर सुरू होते. सूर्य अजून वृषभ राशीतच आहे. म्हणून हाही ज्येष्ठ महिनाच. सूर्य मिथुन राशीत १५ जून, २०२६ रोजी दुपारी १२.५४ नंतर जाणार. म्हणजेच ज्यावेळी सूर्य एकाच राशीमध्ये असताना दोन चांद्रमास सुरू होतात. त्यावेळी पहिला चांद्रमास अधिक मास मानला जातो आणि नंतरचा निज. त्यानुसार १७ मे, २०२६ ते १५ जून, २०२६ हा अधिक ज्येष्ठ आणि त्यानंतरचा निज ज्येष्ठ.

चंद्र–सूर्य एका रेषेत येतात तेव्हा अमावास्या सुरू होते. चंद्राचे भ्रमण सुरूच असते. चंद्र १२ अंश पुढे गेला की प्रतिपदा तिथी. पुढचे १३ अंश याप्रमाणे ३० तिथी झाल्या की पुन्हा अमावास्या येते. एका अमावास्येपासून दुसऱ्या अमावास्येपर्यंत चांद्र महिना. हा चांद्र महिना २९ ते २९।। दिवसांचा असतो. सौरमास (फेब्रुवारी सोडून) ३० किंवा ३१ दिवसांचा असतो. चांद्रमास आणि सौरमास यांच्या कालावधीत


सोने-चांदी मौल्यवान खरेदी !

गोखले ब्रदर्स

सराफी दुकान

गुरुवार दि. १८ : गुरुपुष्यामृत

आपलं दुकान

महाद्वार रोडवर

0231-2546585

दर महिन्याला पडणारा १ ते १।। दिवसांचा फरक भरून काढण्यासाठी दोन अधिक मासातले अंतर कमीत कमी २७ महिने आणि जास्तीत जास्त ३१ महिन्यांपर्यंत असते. १७ जुलै २०२३ ला अधिक श्रावण होता आणि आता १७ मे २०२६ ला अधिक मास सुरू होणार. म्हणजे दोन अधिक महिन्यांतले अंतर ३४ महिने झाले. एकदा अधिक महिना होऊन गेला की त्यानंतर २७ ते ३५ महिने प्रत्येक चांद्रमासात सूर्याचे राशीसंक्रमण सुरळीतपणे सुरू राहते. सूर्य हा संपूर्ण ग्रहमालेचा प्रमुख असल्याने चांद्रमासातील सूर्याच्या राश्यांतराला महत्त्व तर दिलेच आहे, पण चांद्रमासाचे नावही सूर्य कोणत्या राशीत आहे त्यावरून ठरविले जाते. अधिक महिना येतो त्यावेळी चांद्रवर्ष ३५४ ऐवजी ३८४ दिवसांचे होते. पौष महिना कधीही अधिक महिना होत नाही. तसेच मार्गशीर्ष महिनाही फार क्वचित अधिक महिना होतो.

अधिक महिन्याला धोंडा किंवा मलमास म्हणतात. या महिन्याला स्वतंत्र नाव नाही. पौर्णिमेला विशिष्ट नक्षत्र नाही, ज्याला कोणी वाली नाही त्याचा वाली परमेश्वर. कोणतेही स्वतंत्र नाव किंवा इतर चांद्रमासाप्रमाणे अधिपती नसलेला शुभ कार्य करण्यास वर्ज मानलेला, अधिक महिना दु:खी होऊन पूर्ण पुरुषोत्तम भगवान श्रीकृष्णाकडे गेला. दयावंत श्रीकृष्णांनी त्याला अभय दिले आणि आजपासून तू माझ्या नावाने म्हणजे ‘पुरुषोत्तम मास’ म्हणून ओळखला जाशील असे सांगितले.

पुरुषोत्तम मासामध्ये विवाह, उपनयन, गृहप्रवेश, वास्तूशांत, एखाद्या संस्थेची स्थापना, गृह किंवा जमीन खरेदी इ. गोष्टी करू नयेत असा संकेत आहे. अशा समारंभातून काही प्रमाणात आनंद मिळाला तरी यामध्ये सहभागी होणाऱ्या काही जणांच्या मनात क्वचित प्रसंगी परस्पराबद्दल द्वेष आणि गैरसमज निर्माण होऊन मनाची शांति ढळते. स्वत:ला पुरुषोत्तम म्हणजे उत्तम व्यक्ती बनविण्या साठी मनाची शांती आवश्यक आहे. यासाठी श्रीकृष्णाचं स्मरण करा. त्याला पूर्णपणे समजून घ्या. सर्वांवर प्रेम करा. सर्वांशी चांगले वागा. गरजूंना परतफेडीची अपेक्षा न करता आवश्यक मदत करा. स्वत:च्या अंतरंगात डोकावा. स्वत:ला समजून घ्या. पूर्ण पुरुषोत्तम होता नाही आलं तरी आपल्यातले दोष दूर करून एक उत्तम व्यक्ती होण्याचा प्रयत्न करा. मनावरील वाईट विचारांच्या मळाचे थर बाजूस सारा. असा संदेश हा मलमास किंवा पुरुषोत्तम मास देतो असं म्हणावंसं वाटतं.

याचबरोबर शुभ समारंभ करणाऱ्याच्या मनांत मी किती छान समारंभ केला अशी ‘मी’ पणाची भावना निर्माण होईल. आपण मात्र असा समारंभ करू शकत नाही या विचाराने मन अशांत होईल, मनाला वेदना होऊन बाहेरून न दिसणारी क्षतं किंवा छिद्रं अशा व्यक्तीच्या मनाला पडतील. यासाठी अधिक महिन्यांत असंख्य छिद्रे असलेले अनारसे किंवा बत्तासे यांच्या दानाला महत्त्व आहे. वर्षभर आपण सण, समारंभ करतच असतो. २७ ते ३५ महिन्यांनी येणाऱ्या या अधिक महिन्यात तरी समारंभाच्या झगमगाटातून दूर रहा. दान देणारा आणि दान घेणारा दोघांनीही असं वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्यामुळे समोरच्या व्यक्तीच्या मनाला वेदना होऊन क्षतं पडणार नाहीत.

देवाच्या भक्ताची एक कथा सांगितली जाते. अधिक महिन्यांत देवा मी रोज तुला फुलं वाहीन. रोज देवळांत येईन. तुला कोणतं फूल आवडतं ते मला सांग. देव म्हणतो – सत्य, अहिंसा, दया, क्षमा, संयम, समाधान, दान आणि योग हे विचार जोपासणारी फुलं मला आवडतात. किती छान कथा आहे. ही फुलं मनाच्या वेलीवर लागण्यासाठी बदलत्या काळानुसार आपण पुढील गोष्टी एक महिनाभर का होईना करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

स्वत:मधील गुणदोष ओळखून स्वभावातील दोष कमी करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करावा. मोबाईलचा कमीत कमी वापर करण्यासाठी मनाला

**पान २२ वर पहा...**


# मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा !

**(लेखांक पाच)**

सकाळी लवकर जाग आली पण अजून पूर्णपणे उजाडलेले नसल्यामुळे अंथरुणात पडून राहिलो. सहा वाजता सर्व आन्हिक उरकून पुढच्या प्रवासासाठी तयार झालो. सासणी गावाच्या पुढे अलीगढ, बुलंदशहर अशी मोठी शहरे आहेत पण मी शहरातून न जाता शहराबाहेरून हायवेवरून गेलो, दुपारी बारा वाजेपर्यंत जवळपास नव्वद किलोमीटर अंतर पार केले होते, आज रस्त्यामध्येच एका रिक्षावाल्याने मला थांबवून जेवणासाठी शंभर रुपये दक्षिणा दिली. मी ही एका हॉटेलमध्ये शंभर रुपये जेवणासाठी खर्च केले. संध्याकाळी सव्वाचार वाजता हापुड शहरामध्ये पोहोचलो. आज दशमी असल्यामुळे श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण करायचे होते. त्यामुळे लवकरच शहराबाहेर असणाऱ्या एका मंदिरात थांबलो. तेथील साधु महाराजांना विचारून तिथे मुक्काम केला. पारायण केले व रात्री महाराजांनी बनवलेले जेवण जेवून झोपी गेलो. सकाळी महाराजांचा निरोप घेऊन मेरठकडे निघालो. मेरठमध्ये श्री. मंगल पांडे यांचे स्मारक आहे का याची चौकशी केली. पण तेथील लोकांना त्याबद्दल पुरेशी माहिती नव्हती. बराच वेळ फिरून झाल्यानंतर निराश होऊन पुढे निघालो. मेरठमध्येच इंडियन आर्मीची छावणी आहे. तिथे बेळगावचे सुपुत्र श्रीधर पाटील तैनात आहेत. त्यांची अचानक भेट झाली. मी त्यांच्या युनिफॉर्मवर असलेल्या मराठी नावामुळे त्यांना ओळखले व त्यांच्याशी गप्पा मारल्या. त्यांनाही मराठी भाषिक भेटल्यामुळे आनंद झाला. मेरठ होऊन मुजफ्फरनगरकडे जाताना हायवेवर भरपूर ढाबे आहेत. तेथील एका ढाब्यावर भोजन भिक्षा घेऊन पुढे निघालो. मुजफ्फरनगरच्या पुढे पुरकाजी नावाच्या गावाबाहेर हायवेवरील श्री. संदीप सैनी यांच्या कन्हैया ढाब्यावर मुक्काम केला. एकादशीचे पारायण केले व झोपी गेलो. सकाळी ढाब्यावर असणाऱ्या हॅन्ड पंप वर आंघोळ केली. द्वादशीनिमित्त पारायण पूर्ण केले व निघण्यास सज्ज झालो. रात्री थोडा पाऊस झाला होता. आज मी देवभूमी उत्तराखंड येथे प्रवेश केला व थोडे दूर असलेल्या हरिद्वार येथे सकाळी नऊ वाजता पोहोचलो. रात्री इथे जोरदार पाऊस झाल्याचे दिसत होते. सकाळी सुद्धा पावसाळी वातावरण होते. हरिद्वार येथे पतंजली आश्रमाचा खूप मोठा पसारा आहे. व रामदेव बाबांचे कार्य अविरत सुरू आहे. हरिद्वारला त्या भारावलेल्या अवस्थेत मी हरकी पौडी येथे गेलो. तिथे गंगेच्या दोन्ही घाटांवर खूप गर्दी होती. मीही त्यामध्येच सामील झालो. गंगा किनारी बराच वेळ बसून होतो, मागील अठरा दिवसांचा थकवा पूर्णपणे नाहीसा झाला. काही फोटो काढले व ऋषिकेश येथे जाण्यास निघालो. हरिद्वार ते ऋषिकेश हे अंतर फक्त पस्तीस किलोमीटरचे आहे रस्त्याच्या दुतर्फा राजाजी अभयारण्य आहे. दुपारची वेळ असली तरी सुद्धा जास्त गरम होत नव्हते. दुपारी एक वाजता ऋषिकेश येथे पोहोचलो. ऋषिकेश येथे लक्ष्मण झुला पाहण्यास गेलो, पण तिथे काम सुरू असल्यामुळे जाण्यास बंदी होती. तरीही काही अति उत्साही लोक पुढे पुढे जात होते. आज ऋषिकेश इथेच मुक्काम करायचा असल्यामुळे राहण्याची जागा मिळते का याचा शोध सुरू केला. पण मी एकटा असल्यामुळे मला कुठल्याही आश्रमात पटकन जागा मिळाली नाही. बऱ्याच वेळ प्रयत्न केला पण यश आले नाही. त्यामुळे माझे कोल्हापूर स्थित मित्र श्री. हेमंत शिंदे यांच्या मित्राच्या मदतीने (श्री. टमटा हे देहरादून पोलीसमध्ये कार्यरत आहेत) मुन्नी की रेती पोलीस ठाण्यात राहायची व्यवस्था झाली. संध्याकाळी गंगा किनारी पवित्र महाआरती अनुभवायला मिळाली आणि ह्याच साठी केला होता अट्टाहास या भावनेने कृतार्थपणे निद्राधीन झालो.

**– ओंकार गाडगीळ,**
मोबा. ९८२२८७६९२२

# 'भारतरत्न' गोविंद वल्लभ पंत



गोविंद वल्लभ पंत यांचा जन्म १० सप्टेंबर १८८७ रोजी सध्याच्या उत्तराखंड राज्यातील अल्मोडा जिल्ह्यातील खुंट (धामस) नावाच्या गावात एका ब्राह्मण कुटुंबात झाला. उत्तराखंडचे लोक पंडित पंत यांना 'गोठी पाँध ज्यु' असेही म्हणतात. कारण पंतजींचा जन्म त्यांच्या माहेरीच्या गोठ मध्ये झाला होता. हे कुटुंब कुमाऊँच्या अत्यंत प्राचीन आणि आदरणीय परंपरेमधील आहे. या परंपरेची सुरुवात रत्नागिरी जिल्ह्यातून त्यांचा मूळ पुरुष जयदेव पंत यांचेपासून झाली. त्यांनी काही कारणामुळे ११ व्या शतकाच्या सुरुवातीस कुमाऊमध्ये स्थलांतर केले.

गोविंद वल्लभ पंत यांच्या वडिलांचे नाव श्री 'मनोरथ पंत' असे होते. गोविंदाच्या जन्मानंतर तीन वर्षांच्या आतच श्री. मनोरथ पंत आपल्या पत्नीसह पौडी गढवालला गेले. गोविंद त्यांचे संगोपन त्यांची मावशी 'धनीदेवी' हिने अल्मोडा येथे केले. गोविंद यांनी वयाच्या १० व्या वर्षापर्यंत घरीच शिक्षण घेतले. १८९७ मध्ये गोविंद यांना स्थानिक 'रामजे कॉलेज'च्या प्राथमिक शाळेत दाखल करण्यात आले. १८९९ मध्ये वयाच्या १२ व्या वर्षी त्यांचा विवाह पं. बालदत्त जोशी यांची कन्या 'गंगादेवी' यांच्याशी झाला , त्यावेळी ते सातवीत होते. गोविंद कनिष्ठ माध्यमिक परीक्षेत संस्कृत, गणित आणि इंग्रजी या विषयांमध्ये प्रथम श्रेणीसह उत्तीर्ण झाला. इंटरमिजिएटची परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत गोविंद येथेच राहिला. यानंतर त्यांनी अलाहाबाद विद्यापीठात प्रवेश घेतला आणि बी.ए.पदवी त्यांनी गणित, राजकारण आणि इंग्रजी साहित्य या विषयात मिळवली. अलाहाबाद हे पंडित जवाहरलाल नेहरू, पंडित मोतीलाल नेहरू, सर तेज बहादूर सप्रू, सतीशचंद्र बॅनर्जी आणि सुंदरलाल यांच्यासारख्या भारतीय दिग्गजांचा संगम होता. ते मुखर्जींसारखे विद्वान होते. अलाहाबादमध्ये तरुण गोविंदला या महापुरुषांचा सहवास, संपर्क तसेच जागरूकता, व्यापक आणि राजकीय जाणीवेने भरलेले वातावरण मिळाले.

इ.स. १९०९ मध्ये गोविंद वल्लभ पंत यांना कायद्याच्या परीक्षेत विद्यापीठात पहिला क्रमांक मिळाल्याबद्दल 'लम्सडेन' सुवर्णपदक देण्यात आले. अलाहाबाद येथील तत्कालीन 'मुइर सेंट्रल कॉलेज'मधून त्यांनी पदवी प्राप्त केली आणि वकिलीच्या पदव्या प्राप्त केल्या. १९०९ मध्ये ते अलाहाबाद उच्च न्यायालयात वकील झाले. आणि नैनितालमध्ये वकिली सुरू केली. १९१० मध्ये गोविंद वल्लभ पंत यांनी अल्मोडामध्ये वकिली करण्यास सुरुवात केली. अल्मोडा नंतर पंतजींनी काही महिने रानीखेतमध्ये वकिली केली, त्यानंतर पंतजी तेथून काशीपूरला आले. त्या काळात काशीपूरच्या प्रकरणात एस.डी.एम. (डेप्युटी कलेक्टर) यांच्या न्यायालयात जात होते . उन्हाळ्यात हे न्यायालय नैनितालमध्ये ६ महिने आणि हिवाळ्यात ६ महिने काशीपूरमध्ये असायचे . म्हणून काशीपूरनंतर पंतजी नैनितालशी जोडले गेले.

१९१२-१३ मध्ये पंतजी काशीपूरला आले होते, त्यावेळी त्यांचे वडील 'महसूल जिल्हाधिकारी' होते. काशीपूरचे ज्येष्ठ प्रतिष्ठित नागरिक श्री कुंजबिहारी लाल यांचे प्रकरण पंतजींनी हाती घेतलेल्या 'पहिल्या प्रकरणांपैकी एक होते'. यासाठी त्यांना ५ रुपये शुल्क मिळाले. गोविंद वल्लभपंतजींची खटला लढण्याची पद्धत आगळीवेगळी होती, ज्या क्लायंटने आपल्या केसची योग्य माहिती दिली नाही, पंतजी त्यांची केस घेत नसत. एकदा काशीपूरला गोविंद वल्लभ पंत धोतर, कुर्ता आणि गांधी टोपी घालून न्यायालयात गेले. तेथे ब्रिटिश मॅजिस्ट्रेटने आक्षेप घेतला. तरीही यांनी स्वदेशीचा पुरस्कार करत आपला पोशाख बदलण्यास नकार दिला.

पंतजींचा पहिला मुलगा आजारपणाने मरण पावला आणि काही काळानंतर त्यांची पत्नी गंगादेवीही मरण पावली. त्या नंतर त्यांनी आपला सर्व वेळ कायदा आणि राजकारणासाठी घालवला . कुटुंबाच्या दबावामुळे पंतजींचे दुसरे लग्न १९१२ मध्ये अल्मोडा येथे झाले. त्यानंतर पंतजी काशीपूरला आले. पंतजी प्रथम काशीपूरमध्ये 'नजकारी' मधील नमकवाला कोठी येथे वर्षभर राहिले. १९१३ मध्ये पंतजी काशीपूरच्या मोहल्ला खालसा येथे ३-४ वर्षे राहिले. त्यांना नवीन घरात राहायला येऊन एक वर्षही झाले नव्हते जेव्हा त्यांचे वडील मनोरथ पंत यांचे निधन झाले. त्यातच एका मुलाचा जन्म झाला, पण काही महिन्यांनंतर तोही मरण पावला. मुलानंतर १९१४ मध्ये त्यांच्या पत्नीचेही निधन झाले. १९१६ मध्ये पंतजी राजकुमार चौबे यांच्या सभेला गेले. चौबे जी पंतजींचे जवळचे मित्र होते. त्यांच्या दबावामुळे त्यांना काशीपूरच्या श्री. तारादत्त पांडे यांची मुलगी 'कलादेवी' हिच्याशी पुनर्विवाह करण्याचे मान्य केले. त्या काळात पुनर्विवाह हा समाज सुधारणेचा मोठा प्रयत्न होता. त्यावेळी पंतजी ३० वर्षांचे होते.

काशीपूरमध्ये पंतजींच्या वकिलीचा प्रभाव होता आणि त्यांची कमाई दरमहा ५०० रुपयांहून अधिक होती. पंतजींमुळे कुमाऊच्या इतर शहरांपेक्षा काशीपूर राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या अधिक जागरूक होते. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी काशीपूर शहराला काळ्या यादीत समाविष्ट केले. पंतजींच्या नेतृत्वामुळे इंग्रज काशीपूरला गोविंदगड म्हणत. पंतजींच्या प्रयत्नांमुळे १९१४ मध्ये काशीपूरमध्ये 'प्रेमसभे'ची स्थापना झाली. ब्रिटीश राज्यकर्त्यांना हे समजले होते की, समाजसुधारणेच्या नावाखाली येथे दहशतवादी कारवायांना प्रोत्साहन दिले जाते. त्यामुळे ही सभा बंद करण्याचे अनेक प्रयत्न झाले, पण सरकारचे प्रयत्न यशस्वी होऊ शकले नाहीत.१९१४ मध्ये पंतजींच्या प्रयत्नांमुळे 'उदयराज हिंदू हायस्कूल'ची स्थापना झाली. राष्ट्रीय चळवळीत भाग घेतल्याच्या आरोपाखाली ब्रिटिश सरकारने या शाळेविरुद्ध आरोप दाखल करून लिलावाचे आदेश दिले. पंतजींना जेव्हा ही गोष्ट समजली तेव्हा त्यांनी देणग्या मागून ही गोष्ट पूर्ण केली. १९१६ मध्ये काशीपूरच्या 'अधिसूचित क्षेत्र समिती'मध्ये पंतजींचा समावेश करण्यात आला. पुढे ते समितीच्या 'शिक्षण समिती'चे अध्यक्ष झाले. कुमाऊँ मध्ये मोफत आणि अनिवार्य शिक्षणाची पहिली सुरुवात करण्याचे श्रेय पंतजींना जाते. पंतजींनी 'अहिंसे'च्या आधारे कुमावन येथे 'राष्ट्रीय चळवळ' उभी केली. १९१६ मध्ये त्यांनी 'कुमाऊं कौन्सिल'ची स्थापना केली आणि त्याच वर्षी 'अखिल भारतीय काँग्रेस समिती'चे सदस्य म्हणून त्यांची निवड झाली.

कुमाऊंच्या राजकीय चळवळीचे नेतृत्व सुरुवातीपासूनच पंतजींच्या हातात होते. कुमाऊच्या राष्ट्रीय चळवळीची सुरुवात कुली उतर, जंगल चळवळ, स्वदेशी प्रचार आणि परदेशी कपड्यांच्या होळी आणि करबंदीने झाली. पुढे काँग्रेसने जाहीर केलेल्या असहकार चळवळीची लाट हळूहळू कुमावनमध्ये पसरली. १९२६ नंतर ते काँग्रेसमध्ये सहभागी झाले. डिसेंबर १९२० मध्ये काशीपूर येथे कुमाऊं परिषदेचे वार्षिक अधिवेशन भरले होते. जेथे काशीपूर नरेशच्या कोठी येथे १५० प्रतिनिधींच्या राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. पंतजी म्हणाले की, परिषदेचा उद्देश कुमाऊंचे दुःख दूर करणे

हा आहे, सरकारशी लढा देणे नाही.२३ जुलै १९२८ रोजी पंत नैनिताल जिल्हा मंडळाचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. आपल्या भागातील राजकारणाकडे कधीही दुर्लक्ष करता कामा नये, हे पंतजींचे राजकीय तत्त्व होते. १९२९ मध्ये गांधीजी कोसानीहून रामनगर मार्गे काशीपूरला गेले. गांधीजी काशीपूरमधील लाला नानकचंद खत्री यांच्या बागेत राहिले. पंतजींनी काशीपूरमध्ये चरखा संघाची स्थापना केली. त्यांचा मुलगा श्रीकृष्णचंद्र पंत यांचा जन्म १० ऑगस्ट १९३१ रोजी भवळी येथे झाला. नोव्हेंबर १९३४ मध्ये गोविंद वल्लभपंत 'रोहिलखंड-कुमाऊँ' मतदारसंघातून केंद्रीय विधानसभेवर बिनविरोध निवडून आले. १७ जुलै १९३७ रोजी गोविंद वल्लभ पंत संयुक्त प्रांताचे पहिले मुख्यमंत्री झाले, ज्यामध्ये नारायण दत्त तिवारी यांची संसदीय सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली.

पंत १९४६ ते डिसेंबर १९५४ या काळात उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री होते. पंतजींना जमीन सुधारणेत फार रस होता. २१ मे १९५२ रोजी जमीनदारी निर्मूलन कायदा लागू झाला. मुख्यमंत्री म्हणून त्यांची भव्य योजना नैनिताल तराईला लोकप्रिय करण्याची होती.पंतजी विद्वान आणि कायद्याचे अभ्यासक तसेच महान नेते आणि महान अर्थतज्ञ होते. त्यांचे सुपुत्र कृष्णचंद्र पंत हे केंद्र सरकारमध्ये विविध पदे भूषवत असताना नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष होते. १९२३ मध्ये ते 'स्वराज्य पक्षा'च्या तिकिटावर उत्तर प्रदेशच्या विधान परिषदेवर निवडून गेले. १९२७ मध्ये ते उत्तर प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. नोव्हेंबर १९२८ मध्ये त्यांनी लखनौ येथील सायमन कमिशनवर बहिष्कार टाकला. १९२१, १९३०, १९३२ आणि १९३४ च्या स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी सुमारे ७ वर्षे तुरुंगात जावे लागले. १९३७ ते १९३९ पर्यंत ते केंद्र सरकारमध्ये गृहमंत्री होते.

गोविंद वल्लभ पंत हे उत्तम नाटककार होते. मार्कंडेय पुराणातील एका कथेवर आधारित त्यांचे 'वरमाळा' हे नाटक अत्यंत कौशल्याने लिहिले गेले आहे. मेवाडच्या पन्ना नावाच्या परिचारिकेच्या अलौकिक त्यागाचा ऐतिहासिक इतिहास सांगणारा 'राजमुकुट' हा चित्रपट आहे, जो 'अंगूर की बेटी' हे दारूच्या दुष्परिणामांबद्दलचे एक सामाजिक नाटक आहे.

त्यांच्या कार्यकाळात भारतरत्न पुरस्काराची सुरुवात झाली. १९५७ च्या प्रजासत्ताक दिनी एक महान देशभक्त, कुशल प्रशासक, यशस्वी वक्ते, तर्कशुद्ध आणि उदारमतवादी पंत यांना भारताच्या सर्वोच्च 'भारतरत्न' या उपाधीने सन्मानित करण्यात आले. ७ मार्च १९६१ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या जन्मस्थळी त्यांचे स्मारक बांधण्यात आले आहे.

**– विकास मेहेंदळे,**
मोबा. ९४२०१५५११४

# अधिक मास

**पान ७ वरून पुढे...**

संयमित करा. आरोग्यासाठी घातक असलेले पिझ्झा, बर्गर, मॅगी यांसारखे पदार्थ पूर्ण एक महिना खाणार नाही असा निश्चय करा. पाणी आणि वीज यांचा सुयोग्य व काटकसरीने वापर करा. परिसर, रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, सहलीची निसर्गरम्य ठिकाणे इ. जागेवर प्लास्टिक, खाद्यपदार्थ इ. टाकून घाण करणार नाही, मुलगी-जावई यांना काही ना काही आपण देतच असतो. अधिक महिन्याच्या निमित्तानं खास दान देऊन हा आनंद द्विगुणित करावा. या दानामध्ये अनारसे/बत्तासे याचं महत्त्व आहे हे विसरू नका.

आपल्या संस्कृतीशी निगडीत सणवार, उत्सव साजरे करताना बदलत्या काळाशी सुसंगत ठरतील अशा आचारणातील योग्य बदलाने आयुष्याची सांगड घालून आपण निश्चितच अधिक आनंद आणि मन:शांती मिळवू शकू असे नमूद करावेसे वाटते.

**– कमल हर्डीकर,**
मोबा. ९६८९३६९९२६, ९४२०४५८४२५

# जपमाळ एकशे आठ मण्यांची का असते ?

आपण ज्या माळेने जप करतो त्या माळेमध्ये किती मणी असतात, हे तुम्हाला माहिती आहे का?

जप करण्यासाठी जी माळ उपयोगात आणली जाते त्यामध्ये १०८ मणी असतात. माळेमध्ये १०८ मणी का असतात यामागे धार्मिक आणि वैज्ञानिक कारण आहे. माळ रुद्राक्ष, तुळस, स्फटिक किंवा मोत्याने बनलेली असते. या माळांमध्ये चमत्कारिक प्रभाव असतो. या माळेने एखाद्या मंत्राचा जप केल्यास कोणतेही कठीण कार्य सिद्ध होते.

रुद्राक्षाची माळ जप करण्यासाठी सर्वश्रेष्ठ मानली गेली आहे. रुद्राक्ष साक्षात महादेवाचे प्रतिक आहे. रुद्रक्षामध्ये सूक्ष्म किटाणू नष्ट करण्याची शक्ती असते. रुद्राक्ष वातावरणातील सकारात्मक उर्जा ग्रहण करून साधकाच्या शरीरात पोहचवतो. शास्त्रामध्ये सांगितले आहे की,

**बिना दमैश्चयकृत्यं सच्चदानं विनोदकम्।**
**असंख्यता तु यजप्तं तत्सर्व निष्फलं भवेत्।।**

अर्थ - देवाच्या पूजेसाठी आसन खूप महत्वाचे आहे, त्यानंतर दान-पुण्य आवश्यक आहे. याचप्रकारे माळेशिवाय संख्याहीन केल्या गेलेल्या जपाचे पूर्ण फळ प्राप्त होत नाही. यामुळे जप करताना माळ आवश्यक आहे. जप निश्चित केलेल्या संख्येच्या आधारावर केला तर योग्य राहते. यासाठी माळेचा उपयोग केला जातो. यासंबंधी शास्त्रामध्ये सांगितले आहे की,

**षट्शतानि दिवारात्रौ सहस्राण्येकं विशांति।**
**एतत् संख्यान्तितं मंत्रं जीवो जपति सर्वदा।।**

या श्लोकानुसार एक सामान्य पूर्ण रूपाने स्वस्थ व्यक्ती दिवसभरात जेवढ्या वेळेस श्वास घेतो, त्याच्याशीच माळेच्या मण्यांची संख्या १०८ चा संबंध आहे.

सामान्यतः २४ तासांमध्ये व्यक्ती २१६०० वेळेस श्वास घेतो. दिवसातील २४ तासांमधील १२ तास दैनिक कार्यामध्ये व्यतीत होतात आणि शिल्लक १२ तासांमध्ये व्यक्ती १०८०० वेळेस श्वास घेतो. याच काळामध्ये देवी-देवतांचे ध्यान करणे आवश्यक आहे. शास्त्रानुसार व्यक्तीने प्रत्येक श्वास घेताना म्हणजे पूजेसाठी निश्चित केलेल्या १२ तासांमध्ये १०८०० वेळेस परमेश्वराचे ध्यान करणे आवश्यक आहे, परंतु हे शक्य नाही. यासाठी १०८०० वेळेस श्वास घेण्याच्या संख्येमधून शेवटचे दोन शून्य काढून जपासाठी १०८ संख्या ठरवलेली आहे.

या संख्येच्या आधारावर जपाच्या माळेमध्ये १०८ मणी असतात. आणखी एका मान्यतेनुसार माळेमधील १०८ मणी आणि सूर्याच्या कलांचा संबंध आहे. एक वर्षामध्ये सूर्य २१६०० कला बदलतो. सूर्य वर्षभरात दोन वेळेस आपली स्थिती बदलतो. सहा महिने उत्तरायण आणि सहा महिने दक्षिणायन. अशाप्रकारे सूर्य सहा महिन्यातील एका स्थितीमध्ये १०८०० वेळेस कला बदलतो. याच १०८०० संख्येमधील शेवटचे दोन शून्य काढून माळेमध्ये १०८ मण्यांची संख्या निश्चित केली आहे.

माळेचा एक- एक मोती सूर्याच्या कलेचे प्रतिक आहे. सूर्य एकमात्र साक्षात दिसणारे देवता आहेत. ज्योतिष शास्त्रानुसार ब्रह्मांडाला १२ भागांमध्ये विभाजित केले गेले आहे. या १२ भागांचे १२ राशी नाव मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, धनु, मकर, कुंभ आणि मीन आहेत. या १२ राशींमध्ये नऊ ग्रह सूर्य, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनी, राहू आणि केतू विचरण करतात. या ९ ग्रहांच्या संख्येचा गुणाकार १२ राशींशी केला तर १०८ संख्या प्राप्त होते. माळेमधील मोत्यांची १०८ संख्या संपूर्ण ब्रह्मांडाचे प्रतिनिधित्व करते.

आणखी एका मान्यतेनुसार ऋषीमुनींनी माळेमध्ये १०८ मणी ठेवण्याच्या मागे ज्योतीषीय

कारण सांगितले आहे. शास्त्रानुसार एकूण २७ नक्षत्र आहेत. प्रत्येक नक्षत्राचे चार चरण असतात आणि २७ नक्षत्रांचे एकूण १०८चरण असतात. माळेचा एक-एक मोती नक्षत्रांच्या एक-एक चरणाचे प्रतिनिधित्व करतो.

१०८ हा अंक पार केला की जपमाळेत एक मेरुमणी असतो. तो १०८ अंक पूर्ण झाल्याची सूचना हाताला होते. त्यामुळे नेहमी १०८ मण्यांच्या माळेचा जप करण्याची प्रथा आहे. त्यामुळे जपमाळ १०८ मण्यांची असते.

## ।। अवीट गोडीचे श्रीरामायण ।।

### सरयू तीरावरी अयोध्या मनुनिर्मित नगरी

**सरयू तीरावरी**
**अयोध्या मनुनिर्मित नगरी**

**त्या नगरीच्या विशालतेवर**
**उभ्या राहिल्या वास्तू सुंदर**
**मधून वाहती मार्ग समांतर**
**रथ, वाजी, गज, पथिक चालती**
**नटुनी त्यांच्यावरी ।।१।।**

**घराघरावर रत्नतोरणे**
**अवती-भवती रम्य उपवने**
**त्यात रंगती नृत्यगायने**
**मृदंग, वीणा नित्य नादती**
**अलका नगरीपरी ।।२।।**

**स्त्रिया पतिव्रता, पुरुषही धार्मिक**
**पुत्र उपजती निज कुलदीपक**
**नृशंस ना कुणि, कुणि ना नास्तिक**
**अतृप्तीचा कुठे ना वावर,**
**नगरी, घरी, अंतरी ।।३।।**

**इक्ष्वाकु-कुल कीर्ती भूषण**
**राजा दशरथ धर्मपरायण**
**त्या नगरीचे करितो रक्षण**
**गृही चंद्रसा, नगरी इंद्रसा,**
**सूर्य जसा संगरी ।।४।।**

**दशरथास त्या तिघी भार्या**
**सुवंशजा त्या सुमुखी आर्या**
**सिद्ध पतीच्या सेवाकार्या**
**बहुश्रुता त्या रुपशालीनी**
**अतुलप्रभा सुंदरी ।।५।।**

**तिघी स्त्रियांच्या प्रीतिसंगमी**
**तिन्ही लोकिचे सुख ये धामी**
**एक उणे पण गृहस्थाश्रमी**
**पुत्रोदय पण अजुनी नव्हता**
**प्रीतीच्या अंबरी ।।६।।**

**शल्य एक ते कौसल्येसी**
**दिसे सुमित्रा सदा उदासी**
**कैक कैकयी करि नवसासी**
**दशरथासही व्यथा एकची**
**छळिते अभ्यंतरी ।।७।।**

**राजसौख्य ते सौख्य जनांचे**
**एकच चिंतन लक्ष मनांचे**
**काय काज या सौख्य धनाचे**
**कल्पतरूला फूल नसे का**
**वसंत सरला तरी ।।८।।**

गीत रामायणातील दुसऱ्या गीतात निवेदक अयोध्या नगरीचे वर्णन सांगतो आहे. सरयू तीरावरी ही अयोध्या नगरी साक्षात मनूने निर्मिली आहे. शरयू नव्हे, सरयू (जी सरोवरातून उगम पावते ती सरयू). ही नगरी कशी आहे? विधान शास्त्रात सांगितल्या प्रमाणे ती सर्वतोभद्र अशी आहे. या विशाल नगरीत सुंदर वास्तू आहेत, समांतर मार्ग त्यातून वहात आहेत. ते इतके रुंद आहेत की त्यावरून हत्ती, उंट, घोडे सहज जातात. या नगरीवर इक्ष्वाकू कुळातील राजा दशरथ राज्य करतो आहे. त्याचे वर्णन ग दी मा फारच सुंदर पद्धतीने करतात. गृही चंद्रसा (शीतल), नगरी इंद्रसा (कुशल प्रशासक), सूर्य जसा संगरी (तेजस्वी, पराक्रमी). तसेच त्याच्या तिन्ही राण्या कशा आहेत? तर, सुवंशजा, सुमुखी, बहूश्रुता, रूपशालिनी, अतुलप्रभासुंदरी. अहाहा! किती चपखल विशेषणे आहेत पहा !

असं सर्व काही चांगलं आहे. पण हा रघूवंश पुढे नेणारा वंशज अजून जन्माला आलेला नाही. हे अतीव दुःख उराशी बाळगून राजा राज्य करतो आहे. राण्या हेच शल्य मनात ठेऊन आहेत. अनेक नवस करताहेत. राज्याची प्रजा तृप्त आहे. पण जे सुख राजाचे तेच प्रजेचे, जे दुःख राजाचे तेच प्रजेचे. सर्वांच्या मनात हीच काळजी आहे की अजून या प्रीतीच्या अंबरावर पुत्रोदय का होत नाहीये?

**- सुधीर दाजी जोशी**, ९८२२२९८७२६

**कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर**

# शैक्षणिक पारितोषिक योजना २०२६-२०२७

(फक्त सभासदांचे मुलामुलींसाठीच)

## शैक्षणिक अर्हता व बक्षिसे

१. **प्राथमिक शाळा स्तर –** १ ली ते ४ थी परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसे.

२. **माध्यमिक –** ५ वी ते ९ वी परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसे.

३. **स्कॉलरशिप परीक्षा –** ४ थी व ७ वी परीक्षेत यश मिळविणाऱ्यांना बक्षिसे.

४. **हायस्कूल स्तर/एस.एस.सी. –** इयत्ता १० वी स्तरावर प्रथम येणारी मुलगी, प्रथम येणारा मुलगा, तसेच इंग्रजी, गणित, संस्कृत व मराठी या विषयात सर्वोत्तम गुण प्राप्तीसाठी बक्षिसे.

५. गणित प्रज्ञा परीक्षा, MTS, NTS परीक्षा इ.क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या पाल्यांना बक्षिसे.

६. **कनिष्ठ महाविद्यालय/एच.एस.सी. –** इ. १२ वी (तीनही शाखा) मुलांत प्रथम, मुलीत प्रथम, तसेच इंग्रजी, गणित आणि संस्कृत विषयात सर्वोत्तम गुण प्राप्तीसाठी बक्षिसे.

७. **पदवी स्तर –** कला, शास्त्र आणि वाणिज्य या तीन विद्याशाखांत तसेच बी.बी.ए., बी.सी.ए. गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्यांना बक्षिसे.

८. **पदव्युत्तर स्तर –** कला, शास्त्र, वाणिज्य, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शाखांत तसेच एम.सी.ए. मध्ये प्रथम येणाऱ्या पाल्यांसाठी बक्षिसे.

९. **विशेष बक्षीस योजना –** एमबीबीएस, एम.टेक., सीए, आयसीडब्ल्यूए. तसेच ललित कला, संगीत कला, वक्तृत्व कला, क्रीडा, चित्रकला इत्यादी क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या पाल्यांना बक्षिसे.

१०. **पत्रकारिता शिक्षणासाठी प्रोत्साहनपर बक्षीस**
मागील वर्षापासून बक्षिसामध्ये खालीलप्रमाणे वाढ करण्यात आलेली आहे याची कृपया नोंद घ्यावी.

११. **इ. १ ली ते ९ वी –** प्रत्येकी तीन क्रमांक. **१२. इ. ४ थी व इ. ७ वी –** स्कॉलरशिप – प्रत्येकी तीन क्रमांक.

१३. **इ. १० वी –** १. विद्यार्थ्यांत प्रथम व विद्यार्थिनीत प्रथम, २. विषयवार बक्षिसे (प्रथम व द्वितीय)
अ. इंग्रजी, ब. गणित, क.संस्कृत, ड.मराठी, इ. विज्ञान

१४. **इ. १२ वी –** १. विद्यार्थ्यांत प्रथम व विद्यार्थिनीत प्रथम (शाखानिहाय),
२. विषयवार (शाखानिहाय – प्रथम व द्वितीय) –
अ. इंग्रजी, ब.गणित, क.संस्कृत, ड. विज्ञान,

१५. **शाखानिहाय पदवीधर –** आर्टस्, कॉमर्स, सायन्स, इंजिनिअरींग, मेडिकल, एल्.एल्.बी.

१६. **पदव्युतर –** एम्.ई. एम्.टेक्., सर्जरी, एल्.एल्.एम्., एम्.ए. एम्.कॉम, एम्.एस्सी., एम.बी.ए., सी.ए.,UPSC, MPSC

१७. **प्रवेश परीक्षा –** सी.ए.(CPT) एन.डी.ए.(Foundation) आय.आय.टी. (JEE) आय.सी. डब्ल्यू, व सी.एस्.(Foundation)

१८. **सभासदांकरिता –** वक्तृत्व, संगीत, पाककृती, नृत्य, गायन, वादन किंवा सर्व क्षेत्रातील कलाकौशल्यासाठी विशेष बक्षिसे

**संस्थेकडील विहित नमुन्यातील अर्ज पूर्ण भरून आवश्यक ते कागदपत्रे जोडून कोल्हापूर चित्पावन संघ कार्यालयात जमा करावेत. संघाची कार्यकारिणी तसेच शैक्षणिक समिती पारितोषिकांबाबत योग्य निर्णय घेईल. अर्जदार (पालक) संघाचे सभासद असणे आवश्यक आहे.**

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2025-2027


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :** info@shogini.com

**Visit us at :** www.shogini.com


प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी
मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल,
गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.